# झोपडपट्टी बचाव समिती, कांदिवली (पश्चिम)

गणेश नगर, संजय नगर, लालजी पाडा, एकता नगर, जनता कॉलोनी, चारकोप कांदिवली (प), मुंबई - ६७.

---

**कृपया प्रसिध्दीसाठी -** **9 सप्टेंबर 2008**

**हजारोंना बेघर करणा-या प्रस्तावित मेट्रो कार शेडची जागा बदलण्याच्या मागणीसाठी स्वाक्षरी मोहीम सुरु**

**मुंबई, मंगळवार** : "चारकोप येथे मेट्रो कार शेडसाठी प्रस्तावित भूखंडावर हजारो झोपडपट्टीवासी 25 वर्षांहून अधिक काळ राहातात. या सा-यांना बेघर करण्यापेक्षा सदर भूखंडालगतचे रिकामे भूखंड सरकारने कार शेड साठी वापरावेत यासाठी थेट मुख्यमंत्री व पंतप्रधानांना साकडे घालूया," असे आवाहन करीत सदर मागणीसाठीच्या स्वाक्षरी मोहिमेचा भाजपा नेते व माजी केंद्रिय मंत्री श्री.राम नाईक यांनी श्रीगणेश केला. झोपडपट्टी बचाव समिती कांदिवली पश्चिम यांनी ही स्वाक्षरी मोहिम हाती घेतली आहे.

झोपडपट्टी बचाव समितीच्या या कार्यक्रमात बोलताना श्री.नाईक पुढे म्हणाले, "कार शेडसाठी रिकामे भूखंड उपलब्ध असतानाही सामान्य जनतेला वेठीस धरुन हजारोंची वस्ती असलेला भूखंड कार शेडसाठी देण्यात येत आहे, याचा करावा तेवढा निषेध कमीच आहे. एमएमआरडीए चे मुख्य प्रबंधक श्री.रत्नाकर गायकवाड यांची भेट घेऊन यापूर्वीच आम्ही हे आरक्षण बदलायची विनंती केली आहे. पण आता थेट मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख आणि पंतप्रधान श्री. मनमोहन सिंह यांनाच सर्व नागरिकांच्या सहयांचे निवेदन पाठवून हे आरक्षण बदलायला लावू."

या मोहिमेसंबंधी तपशीलवार माहिती देताना समितीचे संयोजक श्री.बाबा सिंह म्हणाले, "गणेश नगर, संजय नगर, लालजी पाडा, गांधी नगर, एकता नगर, जनता कॉलनी, आदी 25-30 वर्षांपासून चारकोप, कांदिवली परिसरातील वस्त्यांमधून 10-12 हजार झोपड्या आहेत. 2-3 हजार लघुउद्योग, दुकाने यांखेरीज 8-10 मान्यताप्राप्त शाळा, 10-15 धार्मिक स्थळेही आहेत. आता अचानक या वस्त्यांची जमीन मेट्रो कार शेडसाठी दिली गेली आहे. खरं तर या सर्व वस्त्यांशेजारीच भूखंड रिकामे आहेत. आम्हा सर्वांना विस्थापित करण्यापेक्षा ते भूखंड कार शेडसाठी वापरावेत यासाठी आम्ही सर्वपक्षीय समिती स्थापन केली आहे. आमची मागणी प्रभावीपणे मांडण्यासाठी सर्व रहिवाशांच्या सह्या घेऊन ते निवेदन एमएमआरडीए, मुख्यमंत्री व पंतप्रधान यांना देण्यात येणार आहे."

निवेदनाव्दारे तीन मुख्य मागण्या करण्यात येणार आहेत. मेट्रो कार शेडसाठी प्रस्तावित भूखंडाऐवजी अन्य रिक्त भूखंड घ्यावा, मेट्रो रेल्वे स्टँडर्ड गेजऐवजी दिल्लीप्रमाणे ब्रॉड गेज करावी व सामान्य माणसाला परवडावे म्हणून मेट्रो रेल्वेचे भाडे उपनगरी रेल्वेप्रमाणे असावे व पास सुविधाही मिळावी, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत, अशी माहितीही श्री.बाबा सिंह यांनी दिली.

शिवसेनेचे श्री.संतोष राणे, बसपाचे श्री.रवि कदम, काँग्रेसचे श्री.बहादुर सिंह, समाजवादी पार्टीचे श्री.संजय सिंह, रिपब्लिकन पार्टीचे श्री.फत्तेमोहम्मद, राष्ट्रवादी काँग्रेसचे श्री.अख्तर मलिक, व्यापारी मंडळाचे श्री.राज पुरोहित, आदी झोपडपट्टी बचाव समितीच्या नेत्यांची, तसेच भाजपा उत्तर मुंबईचे अध्यक्ष व नगरसेवक श्री.योगेश सागर आणि मुंबईचे उपाध्यक्ष श्री.जयप्रकाश ठाकूर यांचीही यावेळी भाषणे झाली.

बाबा सिंह

**(बाबा सिंह)**

**संयोजक**

**मोबाईल क्र.9323046896**